# ○ ऋण निर्देश ○

शिवाजी विद्यापीठाच्या एम्.फिल्. (मराठी) पदवी परिक्षेसाठी "ताराबाई शिंदे यांच्या स्त्रीपुरूष तुलना या निबंधाचा चिकित्सक अभ्यास" हा विषय निवडला आहे. या विषयाच्या निवडीपासून अभ्यास करीत असताना मला गुरूवर्य डॉ. प्रा. विजय निंबाळकर यांचे अनमोल मार्गदर्शन मिळाले त्याबद्दल मी त्यांची मन:पूर्वक आभारी आहे.

तसेच शिवाजी विद्यापीठाचे मराठी विभाग प्रमुख डॉ. विश्वनाथ शिंदे, देवचंद कॉलेज, अर्जुननगर, निपाणी येथील मराठी विभाग प्रमुख डॉ. प्रा. अच्युतराव माने, प्राचार्य डॉ. दड्डी, डॉ. कशाळीकर व ग्रंथपाल यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन मिळाले त्याचेही मी मन:पूर्वक आभार मानते.

तसेच क्रांतिवीर संगोळी रायण्णा कॉलेज ऑफ एज्युकेशन, बेळगांव येथील प्राचार्या सौ. प्रिती देशपांडे तसेच चेअरमन, श्री. बी.एफ्. दंडीण, प्रा. शोभा नाईक, तसेच माझे शैक्षणिक स्फूर्तीस्थान माझे यजमान कै. विनोदकुमार आजरेकर व भाऊ बाबुराव पाटील, कोल्हापूर यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन मिळाले यांचे ही मी पूर्णपणे आभार मानते.

श्री. खाडे यांनी टंकलेखनाचे काम वेळेवर व उत्तमरित्या पूर्ण केले याबद्दल पुन्हा एकदा या सर्वांचे मी मन:पूर्वक आभार मानते.

- प्रपाठक सुनंदा चौगुले

# प्रास्ताविक

एकोणिसावे शतक हे संक्रमण शतक म्हणून ओळखले जाते. भारतीय संस्कृतीच्या पाश्चात्य इतिहासात तिची प्रथमच एका संस्कृतीशी टक्कर ह्या शतकात झाली. आणि परिवर्तनाचे एक वेगवान आवर्त अवनतीच्या तळाला गेलेल्या तात्कालीन समाजाला ढवळू लागले. या नव्या संस्कृतीने आणलेल्या नवीन मूल्यांच्या प्रकाशाने नवविचारांच्या मोकळ्या वाऱ्याने मध्यमवर्गीय तरूण, शिक्षित पिढी खडबडून जागी झाली. याचा परिणाम मराठी साहित्यावरही झाला.

१९वे शतक हे मराठी साहित्याच्या दृष्टीने मोलाचे शतक आहे. इतर वाड्.मयप्रकाराबरोबर 'निबंध' या वाड्.मयप्रकाराची सुरूवात व भरभराट याच शतकात झाली. इंग्रजी वाड्.मयाच्या अनुषंगाने व वृत्तपत्राच्या सहाय्याने निबंधलेखनातुन वैचारिक व मोलाचे विचार लोकापर्यंत पोहचविण्याचे श्रेय चिपळूणकर, आगरकर, टिळक, फुले या सारख्या लेखकांना जाते. या वैचारिक लेखनाचा परिणाम कांही स्त्रियांवर झाला. समाजात परंपरेने चालत आलेली सनातन धार्मिकवृत्ती, अंधश्रध्दा, रूढी शिक्षणाला विरोध, बालविवाह, विधवांचे प्रश्न, केशवपन, सतीची चाल इत्यादी प्रथा चालू होत्या. १९व्या शतकातील सामाजिक परिस्थितीचा अभ्यास केला असता असे दिसून येते की, लोकधार्मिक वृत्तीचे, अंधश्रध्दाळू, स्त्री शिक्षणास विरोध बंदी सतीची चालू, विधवांचे केशवपन, पुरूषप्रधान संस्कृतीचे वर्चस्व अशा स्थितीत जर का एखाद्या स्त्रीच्या हातून एखादा प्रमाद घडला तर तिच्यावर टीकेचा हल्ला करून एकूणच स्त्री जातीला हीन केले जाई. अशा प्रकारचे स्त्रियांवर होणारे अन्याय अत्याचार थांबविण्यासाठी रूढींच्या चौकटी मोकळया

करण्यापासून परिवर्तनाला सुरूवात झाली. या उदारमतवादी पुरूषांचा आधार घेवून या शतकात अनेक स्त्रिया वेगळ्या वाटेवर पावले टाकू लागल्या. आपल्या कुचंबणेचा प्रतिकार करू लागल्या. आणि हळू हळू पडणारी तिची पाऊले स्त्री सन्माचाच्या, स्त्री समानतेच्या स्त्रिच्या मनुष्यत्वाच्या वाटेवर ठामपणे आक्रमण करू लागली. त्यामुळे या शतकाच्या पार्श्वपटावर अनेक बंडखोर स्त्रिया दिसू लागल्या. त्यापैकी स्त्री जीवनावर प्रकाश टाकणाऱ्या व स्त्रियांना प्रतिष्ठा प्राप्त करून देणाऱ्या स्त्री पुरूष समानतेसाठी झगडणाऱ्या "ताराबाई शिंदे" या १९व्या शतकातील महत्वाच्या स्त्री लेखिका होत.

ताराबाई शिंदे यांनी लिहिलेला स्त्रीपुरूष. तुलना हा निबंध स्त्री जीवनावर प्रकाश टाकणारा निबंध आहे. देशभगिनींचा अभिमान जागृत करणारा निबंध आहे. या पुस्तकात स्त्री पुरूषामधील सारा असमतोलपणा दूर करून स्त्री-जातीला पुरता न्याय मिळवून द्यावा अशी खटपट आहे.

"स्त्री पुरूष तुलना" या निबंधात स्त्रियांच्या विवाहपूर्व आणि विवाहोत्तर संकटांचे चित्रण अतिशय बारकाव्याने केलेले आहे. व्यवहारात स्त्रिया आणि पुरूष यांच्या समान दर्जाकडे दुर्लक्ष करून समाजात स्त्रीच्या वाट्याला जे दु:सह जिणे येते ते पाहून त्यांच्या जिवाचा तिळपापड होतो. पुरूषांच्या दुर्वर्तनाचा बळी ठरून शेवटी स्त्रियांच्या वाट्याला निंदानालस्ती अपमान शिक्षा आणि निराधारपण येते याची त्याना टोचणी लागलेली आहे. विधवांना पुनर्विवाहास बंदी असल्यामुळे स्त्रियांची होणारी कुचंबणा आणि लाखो, कोट्यावधी स्त्रिया वैधव्याचे दु:ख कसकसे भोगतात व त्यापासून होणारे अनर्थ याचे चित्रण ताराबाईंनी अतिशय कळकळीने व्यक्त केले आहे. व त्याबरोबर हिन्दू समाजात नियंत्रित

करणारी सर्व शास्त्रे नुसती पुरूषानुकूल आहेत असे नाही तर, ती सरळ सरळ स्त्रीविरोधी आहेत. असा त्या आरोप करतात. आपल्या साऱ्या परंपरा, रूढी स्त्री जातीच्या दुःखास कारणीभूत आहेत हे सारे चित्र पालटले पाहिजे व स्त्रिला सन्मान व प्रतिष्ठा लाभली पाहिजे. हा त्यांचा प्रयत्न आहे. यामधूनच ताराबाईंच्या स्वतंत्र विचारांची मालिका सुरू झालेली आहे.

"स्त्रीपुरूष तुलना" या निबंधात ताराबाईंचे विचार पुरोगामी, आधुनिक, कामदर्शी तर आहेत पण ते तर्कशुध्द पध्दतीने मांडलेले हा एक त्यांच्या व्यक्तिमत्वाचा विशेष पैलूच म्हणावा लागेल. ताराबाई शिंदेचे स्त्रीविषयक विचार अत्यंत मोलाचे आहेत. ताराबाई शिंदे यांनी किंवा आपले स्त्री विषयक विचार शंभर वर्षापूर्वी व्यक्त केलेले आहेत. पण स्त्रीपुरूष तुलना ही पुस्तिका आजही पुन:पुन्हा वाचावीशी वाटते. त्यातील व्यक्त झालेल्या विचारांचा विचार करावासा वाटतो. विचार करता करता असे वाटते की, संकटात सापडलेल्या अन्याय व अत्याचार होत असलेल्या स्त्रियांना आज ही पुस्तिका धीर देऊ शकेल. अशा स्थलकालाच्या भोवऱ्यात न सापडणारी वर्षानुवर्षे अबलाना आशेचा किरण दाखविणारी ही पुस्तिका पुढील काळातही मार्गदर्शक ठरणारी ही पुस्तिका असल्यामुळे ताराबाई शिंदेंचे हे पुस्तक एम.फिल्. पदवी परीक्षेसाठी चिकित्सकपणे अभ्यासण्यासाठी निवडलेला आहे. डॉ. स.गं. मालशे यांनी या निबंधाचे प्रथम संशोधन करून श्रीमती ताराबाई शिंदे यांच्या विषयीची चरित्रात्मक माहिती ही गोळा केली. त्यानंतर डॉ. नागनाथ कोत्तापल्ले व डॉ. विलास खोले यांनीही या निबंधाच्या संपादित आवृत्त्या आपल्या अभ्यासपूर्ण विवेचक प्रस्तावनेसह हा निबंध प्रकाशित केला आहे.

लेखक "गो.पु. देशपांडे म्हणतात – 'निबंध' हा वाङ्.मयप्रकार मराठीत मागे पडतो आहे असे मला नेहमी वाटते. ललित निबंध जीवंत आहे पण निबंध मरणोन्मुख आहे की काय अशी धास्ती वाटावी अशी परिस्थिती आहे.")

गोल्डमन यानी निबंधाचे मोठेपण दर्शविणारे विवेचन दिलेले आहे. त्यात निबंधाच्या विशिष्ठ परिस्थितीची चर्चा आहे. हे खरे आहे पण तो त्याचे निमित्त करून प्रबोधनाच्या विचारांची (Thought of Enligntmeet) एक समस्या दिसते. (निबंधाचे हे मोठेपण आहे) हे गोल्डमनचे विधान गो.पु. देशपांडेना महत्वाचे वाटते. म्हणूनच "स्त्रीपुरुष तुलना" या ताराबाईंच्या पुस्तकाचा निबंध म्हणून मोठेपणा प्रस्तुतच्या प्रबंधिकेत पाहिला आहे. हा निबंध अभ्यासत असताना मला जे जाणवले ते या प्रबंधिकेत मांडण्याचा मी प्रयत्न केलेला आहे.

- सुनंदा चौगुले

*****